मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक १ डिसेंबर२०२३ । पान १

# तर खऱ्या अर्थाने शिक्षणाचा जल्लोष : आयुक्त

## गुणवत्ता वाढीची जबाबदारी स्वीकारण्याची मानसिकतानिर्माण झाली पाहिजे

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शाळांच्या गुणवत्ता वाढीची जबाबदारी स्वीकारण्याची मानसिकता त्या शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि पालक समितीमध्ये निर्माण झाली पाहिजे, त्यातूनच शाळांचा दर्जा वाढण्यासोबतच मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल आणि हाच खऱ्या अथाने शिक्षणाचा जल्लोष साजरा करण्याचा दिवस असेल, असे प्रतिपादन आयुक्त शेखर सिंह यांनी केले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधील स्पर्धात्मक, गुणात्मक तसेच नाविन्यपूर्ण विचार वाढीकरिता जल्लोष शिक्षणाचा २०२३-२४ या स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते निगडी येथील ग दि माडगूळकर सभागृह येथे करण्यात आले यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, आकांक्षा फाउंडेशनच्या जयश्री ओबेरॉय तसेच मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. भारत दर्शन हा विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी महत्वपूर्ण उपक्रम आहे. त्यातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभांमध्ये वाढ होऊन यशस्वी बनण्याच्या त्यांच्या आकाशांना आणि स्वप्नांना अधिक बळ मिळेल. तसेच




मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, कोअर टीम यांनी पालकांना तसेच विद्यार्थ्यांना सोबत घेऊन सांघिक पद्धतीने जल्लोष शिक्षणाचा हा महत्वाकांक्षी उपक्रम यशस्वी करण्यासाठी काम केले तर महापालिका शाळांमध्ये नक्कीच आमूलाग्र बदल घडेल, असा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी व्यक्त केला. जल्लोष शिक्षणाचा हा दोन दिवसांचा उपक्रम नाही. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सांस्कृतिक, शारीरिक विकास होण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या अनेक उपाययोजना आणि घटक आहेत ज्यांची अंमलबजावणी मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी वर्षभर केली पाहिजे असे आयुक्त सिंह यावेळी म्हणाले. तसेच शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांचे धोरण कायम राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. नेहा शिंदे म्हणाली, या सहलीमुळे विमानात बसण्याची संधी मिळाली आणि आमच्या स्वप्नांना आकाशात झेप घेण्याची अनुभूती आली. विमानात बसण्याचे आणि भारत फिरण्याचे स्वप्न विद्यार्थी दशेत पूर्ण होईल असे वाटले नव्हते. भारत दर्शन यात्रेतून आमच्या ज्ञानात भर पडली आणि इसरो सारख्या ठिकाणी जाऊन वैज्ञानिक दृष्टिकोन मिळाला. तसेच विविध शैक्षणिक संस्थांना भेट देऊन आमच्या ज्ञानाच्या कक्षाही रुंदावल्या. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, जल्लोष शिक्षणाचा या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि कल्पना प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण करून देण्यात आले असून याद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा, कला, हस्तकला, तंत्रज्ञान आदी विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच त्यांच्या कल्पक विचारसरणीला चालना देण्यासाठी मदत मिळत आहे. यातील खरा केंद्रबिंदू जरी विद्यार्थी असला तरी मुख्य घटक शिक्षक आहे. शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये कौतुकास्पद कामगिरी विद्यार्थ्यांची भारत दर्शन सहल चांगल्या रितीने पार पडली आणि यातून विद्यार्थ्यांना अनेक नवनवीन गोष्टींची माहिती मिळाली. पुढील वर्षीही अशाच सहलीचे आयोजन करण्यात येणार असून सहलीमध्ये भाग घेणाऱ्या आणि पुढील शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये अव्वल येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याची जबाबदारी आता शिक्षकांची असणार आहे, असेही अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यावेळी म्हणाले.

# त्या क्रीडांगणासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार घालणार लक्ष

## खेळाचे मैदान वाचविण्यासाठी राष्ट्रवादी, सोसायटींनी लढा उभारला

**मोशी न्यूज एक्सप्रेस मराठी।** परिसरातील रिव्हर रेसिडन्सी चौकातील खेळाचे मैदान हॉर्स रायडिंग महापालिका प्रशासनाने दिले आहे. हे मैदान अबालवृध्दांसाठी महत्वाचे असून, ते वाचले पाहिजे यासाठी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट आणि नगरसेवक वसंत बोराटे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. दादा आमचे मैदान वाचवा अशी मागणी केली. त्यावर लवकरच महापालिकेत बैठक घेऊ आणि विषय मार्गी लाऊ असे आश्वासन पवार यांनी दिले आहे. मोशीतील हे खेळाचे मैदान वाचविण्यासाठी राष्ट्रवादी, शिवसेना विद्यार्थी, मोशीतील सोसायटींनी लढा उभारला आहे. मोशी परिसरात कुठेही खेळाचे मैदान उपलब्ध नाही. क्रीडांगण नसल्याने खेळाडूंची, विद्यार्थ्यांची गैरसोय होते. जे क्रीडांगण



उपलब्ध आहे. त्यावर महापालिका प्रशासनाने हॉर्स रयडिंग सुरु करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. या गोष्टींना आमचा विरोध आहे, अशी भूमिका त्या नागरिकांकडून घेतली जात आहे. महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट कर्जत येथे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेतली. हॉर्स रायडिंगसाठी हे मैदान कशा पध्दतीने दिले. याबाबत सविस्तर चर्चा करून, आमचे मैदान वाचवा अशी मागणी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह माजी नगरसेवक वसंत बोराटे यांनी केली. त्यावर लवकरच निर्णय घेऊ असे आश्वासन अजित दादांनी दिले असल्याची माहिती प्रा. कविता आल्हाट यांनी दिली. माजी नगरसेवक वसंत बोराटेरिव्हर सोसायटीच्या चौकातील मैदानात अबालवृध्द असतात. हे मैदान चांगले विकसित करून विविध सोयी-सुविधा देणे अपेक्षित होते. चिमुकल्यांना खेळण्यासाठी हे एकच मैदान त्यावर हॉर्स रायडिंगचा निर्णय़ चुकीचा झाला. या निर्णयाला आपला विरोध आहे.

# पोलीस करणार प्रत्येक वाहनाची तपासणी

## संशयित वाहन आढळल्यास होणार कारवाई

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी ‘वाहन तपासणी उपक्रम’ हाती घेतला आहे. याअंतर्गत वाहतूक शाखेच्या २० पथकांकडून ठिकठिकाणी जाऊन वाहनांची तपासणी केली जाणार आहे. वाहन चोरी आणि बनावट नंबर प्लेट बसवून होणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात औद्योगिक वसाहती, मोठ्या शिक्षण संस्था असल्याने शहरामध्ये



मोठ्या प्रमाणात परराज्यातून तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून शिक्षण, नोकरी व रोजगारनिमित्त अनेक नागरिक आले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात वाहने वापरली जातात. त्यामध्ये दुचाकी वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. वाहन चोरी तसेच बनावट नंबर प्लेटचा वापर लक्षात घेता अशा घटनांना प्रतिबंध करणे व त्यांचा शोध घेण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेमार्फत ई-चलन कार्यप्रणाली अंतर्गत तयार केलेल्या नाकाबंदी ॲपद्वारे वाहन तपासणी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेअंतर्गत १४ वाहतूक विभाग आहेत. प्रत्येक विभागातील प्रत्येकी २ पोलीस अंमलदार यांची एक टीम अशा एकूण १४ टीम व पिंपरी-चिंचवड वाहतूक नियत्रंण कक्षाच्या ६ टीम अशा एकूण २० टीम तयार करण्यात आल्या आहेत. या टीम पिंपरी चिंचवड शहर परिसरातील रेल्वे स्टेशन, बस स्थानक, शॉपिंग मॉल, शाळा, उड्डाणपुलाखालील पार्किंग, सोसायटी पार्कींग, बेवारस वाहने इत्यादी ठिकाणी पार्क केलेल्या दुचाकी नाकाबंदी ॲपद्वारे चेकींग करुन वाहनांची तपासणी करणार आहेत. वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी सांगितले की, शहरात होणारी वाहन चोरी, बनावट नंबर प्लेट वापरणे अशा घटनांचा शोध घेत त्यांना प्रतिबंध करण्यासाठी वाहन तपासणी उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाची सुरुवात १ डिसेंबर पासून होणार आहे. चोरीची वाहने, नंबर प्लेट बदललेली वाहने आढळल्यास अशा वाहनांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

# श्री गणेश सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी शंकर जगताप बिनविरोध

## संतोष देवकर यांची उपाध्यक्षपदी निवड

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** गणेश सहकारी बँकेच्या स्थापनेपासून तळागाळातील घटकांसाठी ही बँक महत्वपूर्ण ठरली आहे. लोकसेवेचा वसा घेतलेल्या या बँकेची स्थापना लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून करण्यात आली होती. ग्राहकांना वेगवान सेवा देण्यासाठी लक्ष्मणभाऊ हे नेहमीच आग्रही होते. त्यांचीच प्रेरणा घेवून बँकेला पुढे घेवून जाण्यासाठी आम्ही कटिबद्ध असणार असल्याची भावना श्री गणेश सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केली. बँकेच्या पिंपळे गुरव येथील मध्यवर्ती कार्यालयात निवडून आलेल्या संचालकांची बैठक झाली. या बैठकीत सर्वानुमते शंकर जगताप यांची अध्यक्षपदी, तर संतोष देवकर यांची



उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीनंतर शंकर जगताप बोलत होते. आगामी काळात सहकार क्षेत्र हे देशाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळेच लक्ष्मण जगताप, नानासाहेब शितोळे, राजेंद्र राजापूरे, रावसाहेब चौगुले आणि उद्धव पटेल यांच्या पुढाकाराने सन १९९८ साली बँकेची स्थापना केली होती. लोकनेते लक्ष्मणभाऊ यांच्यावर असलेल्या विश्वासामुळे तसेच बँकेच्या माध्यमातून मिळणाऱ्या तत्पर सेवा, आकर्षक कर्ज योजना, ठेव योजना यामुळे बँकेकडे ग्राहकांचा ओघ सातत्याने वाढत आहे. काही दिवसांपूर्वी बँकेची पंचवार्षिक निवडणूक घेतली होती. या निवडणुकीत १७ संचालक बिनविरोध निवडून आले होते. याच संचालक मंडळातून अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली आहे.या निवडणुकीत निवडणूक अधिकारी म्हणून नागनाथ केंजेरी, सहायक शशिकांत शिंगारे, गजेंद्र सवईकर, यांनी कामकाज पाहिले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय बाईत, शाखा व्यवस्थापक ईश्वर काटे व अन्य कर्मचारी वर्ग उपस्थित होता. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी पुढाकार घेताना बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या प्रथेला सुरुवात केली होती. मात्र, आमदार जगताप हयात नसताना त्यांचे बंधू शंकर जगताप यांनीदेखील हीच परंपरा कायम राखताना ही पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध केली होती.

### कार्यकारिणी पुढीलप्रमाणे!

**» अध्यक्ष : शंकर पांडुरंग जगताप, उपाध्यक्ष: संतोष सखाराम देवकर, कार्यकारिणी सदस्य: राजेंद्र शंकर राजापूरे, दत्तात्रय गोविंद चौगुले, शशिकांत गणपत कदम, संजय गणपत जगताप, उद्धव मुरार पटेल, सुरेश शंकर तावरे, शिवलिंग बसवंत किनगे, अंकुश रामचंद्र जवळकर, मधुकर सोपान रणपिसे, सुरेश तात्याबा शिंदे, शहाजी भगवान पाटील, प्रमोद नाना ठाकर, अभय केशव नरडवेकर. संचालिका : राजश्री बिभिषण जाधव, शैला जनार्धन जगताप.**

# पुणे जिल्ह्यातील मजूर गेले कुठे?

## प्रत्यक्ष कामावर केवळ ८५१ मजूर असल्याचे समोर

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** हाताला काम नसल्याची ओरड एकीकडे होत असताना पुणे जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत तब्बल ९७ हजार मजुरांनी नोंदणी केली आहे. मात्र, प्रत्यक्ष कामावर केवळ ८५१ मजूर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मजूर गेले कुठे?, या प्रश्नाने जिल्हा प्रशासन बुचकाळ्यात पडले आहे. जानेवारी ते जुलै या कालावधीत पाण्याच्या अभावामुळे शेतीची कामे नसल्याने गावागावांत रोजगारीचा प्रश्न निर्माण होतो. या स्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने रोहयो अंतर्गत सार्वजनिक कामे करून गावात रोजगार निर्माण करण्यात येतात. जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यानंतर शेतीची काम



सुरू होतात. यामुळे रोहयोच्या कामावरील मजूर कमी होतात. मात्र, यंदा विलंबाने दाखल झालेल्या मोसमी पावसाने सरासरीदेखील गाठली नाही. परिणामी राज्यभरात दुष्काळी स्थिती ओढवली आहे. त्यामुळे कामाच्या शोधासाठी राज्याच्या विविध भागांतून नागरिकांचे पुण्यात स्थलांतर होण्याची शक्यता गृहित धरून जिल्हा प्रशासनाने रोहयो अंतर्गत कामे उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. एकीकडे कामे उपलब्ध असताना प्रत्यक्ष कामावर मजूर नसल्याचे जिल्हा प्रशासनाच्या पाहणीत लक्षात आले आहे. 'सध्या रोहयो अंतर्गत पुणे जिल्ह्यात २१४ कामे उपलब्ध असून, त्यावर ८५१ मजूर कार्यरत आहेत. ९७ हजार ३७५ मजुरांची जॉब कार्ड सक्रिय आहेत. उन्हाळ्यात मजुरांची संख्या वाढण्याची शक्यता आहे' असे रोहयोच्या उपजिल्हाधिकारी दीप्ती सूर्यवंशी-पाटील यांनी म्हटले आहे. रोजगारासाठी रोहयो अंतर्गत रस्ता बनवणे, पाणंद रस्ते तयार करणे, माती नालाबांध बनवणे, वनराई बंधारा, सामूहिक शेततळी, गाव तलाव, साठवण तलाव, जैविक बंधारा, खारजमीन विकास बंधारा, पाझर तलावातील गाळ काढणे, रोपवाटिका, कालव्याची दुरुस्ती, नूतनीकरण व अस्तरीकरण, सिंचन विहीर अशी सार्वजनिक कामे केली जातात. या गावांमध्ये रोहयोमार्फत जलसंधारणाची कामे करण्यात येतात. या कामांमुळे भविष्यात गावातील दुष्काळीस्थिती दूर होण्यास मदत होते. रोहयोतून यापूर्वी २७२ रुपये मजुरी मिळत असे, ती आता ४४७ रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे कामाच्या शोधासाठी राज्याच्या विविध भागांतून नागरिकांचे पुण्यात स्थलांतर होण्याची शक्यता गृहित धरून जिल्हा प्रशासनाने रोहयो अंतर्गत कामे उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे.

### गावागावांत रोजगारीचा प्रश्न निर्माण

**» मात्र, प्रत्यक्ष कामावर केवळ ८५१ मजूर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मजूर गेले कुठे?, या प्रश्नाने जिल्हा प्रशासन बुचकाळ्यात पडले आहे. जानेवारी ते जुलै या कालावधीत पाण्याच्या अभावामुळे शेतीची कामे नसल्याने गावागावांत रोजगारीचा प्रश्न निर्माण होतो. या स्थितीवर मात करण्यासाठी शासनाच्या वतीने रोहयो अंतर्गत सार्वजनिक कामे करून गावात रोजगार निर्माण करण्यात येतात. जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यानंतर शेतीची काम सुरू होतात. यामुळे रोहयोच्या कामावरील मजूर कमी होतात. मात्र, यंदा विलंबाने दाखल झालेल्या मोसमी पावसाने सरासरीदेखील गाठली नाही.**

# पीएमआरडीए — महापालिका आमनेसामने

## गणेशखिंड रस्त्यावरील दोन मेट्रो स्थानकांवरून तिढा निर्माण

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावर पुणेरी मेट्रोचे काम सुरू आहे. आता या कामात गणेशखिंड रस्त्यावरील दोन मेट्रो स्थानकांवरून तिढा निर्माण झाला आहे. रिझर्व्ह बँक कार्यालय आणि वेधशाळेसमोरील शिवाजीनगर या दोन स्थानकांचे प्रवेशद्वार आणि बाहेर पडण्याचे जिने कुठे असावेत, असा वाद निर्माण झाला आहे. यामुळे महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आमनेसामने आले आहेत. गणेशखिंड रस्त्यावर रिझर्व्ह बँक कार्यालय आणि शिवाजीनगर ही पुणेरी मेट्रोची दोन स्थानके नियोजित आहेत. या स्थानकांचे काम सध्या सुरू आहे. पुणेरी मेट्रोचा हा प्रकल्प पीएमआरडीएकडून सार्वजनिक खासगी भागीदारीतून टाटा समूहासोबत सुरू आहे. या मेट्रो मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा गणेशखिंड रस्त्याची रुंदी ३६ मीटर गृहित धरून करण्यात आला. नंतर या रस्त्यावर दुमजली उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन झाले. त्यात रस्ता अरुंद होत असल्याने त्याची रुंदी ३६ वरून ४५ मीटर करण्याचा निर्णय झाला. त्यामुळे या संपूर्ण रस्त्याची रुंदी ४५ मीटर करण्याचे पाऊल महापालिकेने उचलले. सुमारे दोन वर्षांनंतर भूसंपादन पूर्ण होऊन आता हे रस्त्याचे रुंदीकरण पूर्ण होत आले आहे.



मेट्रोच्या या दोन्ही स्थानकांचे प्रवेश करण्याचे आणि बाहेर पडण्याचे जिने ४५ मीटरच्या रस्त्याच्या आतमध्ये येत आहेत. यावर महापालिकेने पीएमआरडीएला पत्र पाठवून हे जिने ४५ मीटर रस्ता रिकामा ठेवून बाहेर घेण्यास सांगितले. मात्र, जिने बाहेर घ्यावयाचे झाल्यास आणखी भूसंपादन करावे लागणार आहे. एकंदरीत भूसंपादची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने आता स्थानकांचा उभारणीचा तिढा निर्माण झाला आहे. त्यामुळे या स्थानकांच्या जिन्याचे काम सध्या थांबविण्यात आले आहे. यावर मार्ग काढण्यासाठी महापालिका आयुक्त विक्रम कुमार आणि पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल हे लवकरच बैठक घेणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. महापालिकेने सांगितल्याप्रमाणे ४५ मीटर रस्त्याबाहेर मेट्रो स्थानकांचे जिने घ्यावयाचे झाल्यास रिझर्व्ह बँक, आकाशवाणी, वेधशाळा यासह इतर संस्थांची आणखी जागा घ्यावी लागेल. भूसंपादनाची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने यामुळे प्रकल्पाला एक ते दीड वर्षांचा विलंब लागू शकतो.

> **“ रिझर्व्ह बँक आणि वेधशाळेसमोरील मेट्रो स्थानकांचे जिने ४५ मीटर रस्त्याच्या बाहेर असावेत, असे महापालिकेचे म्हणणे आहे. यासाठी अतिरिक्त भूसंपादन करावे लागेल. यावर पीएमआरडीए आयुक्त आणि महापालिका आयुक्त यांच्यात लवकरच बैठक होऊन निर्णय घेतला जाईल.**
>
> **— रिनाज पठाण, मुख्य अभियंता, पीएमआरडीए**

> **“ गणेश खिंड रस्त्याचा पुढील ५० वर्षांचा विचार करून वाहतूक नियोजन आवश्यक आहे. त्यामुळे मेट्रो स्थानकांचे जिने ४५ मीटर रुंदीच्या रस्त्याच्या आतमध्ये आल्यास तो अरुंद होईल. त्यामुळे आणखी भूसंपादन करूनही हे जिने बाहेरील बाजूस घेता येतील.**
>
> **— विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त, महापालिका**

# ससूनच्या अधिष्ठातापदाचा पुन्हा घोळ!

## राज्य सरकारच्या आदेशाने गोंधळ वाढला

पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।

बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदावरून डॉ. संजीव ठाकूर यांना राज्य सरकारने पदमुक्त केले होते. त्याच दिवशी उच्च न्यायालयानेही डॉ. ठाकूर यांची नियुक्ती रद्द करून आधीचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्या पुनर्नियुक्तीचे आदेश दिले होते. त्यानंतर डॉ. काळे हे अधिष्ठातापदाचा कार्यभार स्वीकारून लगेचच रजेवर गेले. आता सुमारे २० दिवसांनी डॉ. काळे यांच्या तात्पुरत्या नियुक्तीचा आदेश राज्य सरकारने काढला आहे. ससूनच्या अधिष्ठातापदावरून त्यांची बदली करण्याचा आधीचा आदेश उच्च न्यायालयाने १० नोव्हेंबरला रद्द केला होता. त्याचदिवशी अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ठाकूर दोषी आढळले. राज्य सरकारने डॉ. ठाकूर यांना पदमुक्त केले तर अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते यांना निलंबित केले. त्यामुळे अधिष्ठातापद रिक्त झाल्याने डॉ. काळे यांनी तातडीने ११ नोव्हेंबरला या पदाचा कार्यभार स्वीकारला. डॉ. काळे हे कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच रजेवर गेले. त्यानंतर २० दिवसांनी त्यांच्या नियुक्तीचा आदेश निघाला आहे. सध्या ससूनच्या अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. शेखर प्रधान यांच्याकडे आहे. विशेष म्हणजे सेवा ज्येष्ठतेनुसार डॉ. शीनिवास शिंत्रे यांच्याकडे हा अतिरिक्त कार्यभार सोपविणे आवश्यक होते. मात्र, ते रजेवर असल्याने डॉ. प्रधान यांच्याकडे ही जबाबदारी आली आहे. त्यामुळे अधिष्ठातापदाचा अतिरिक्त कार्यभार कोणीच स्वीकारण्यास तयार नसल्याची चर्चा ससूनमध्ये रंगली होती. डॉ. विनायक काळे यांची ससूनच्या अधिष्ठातापदी नियुक्ती करण्याचा आदेश मुख्यमंत्र्यांकडून निघणे अपेक्षित होते. याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाने पाठविला मुख्यमंत्री कार्यालयाला पाठविला होता. त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता डॉ. काळे यांच्या तात्पुरत्या नियुक्तीचा आदेश वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव शिवाजी पाटणकर यांनी काढला आहे. ससूनच्या अधिष्ठातापदावरून त्यांची बदली करण्याचा आधीचा आदेश उच्च न्यायालयाने १० नोव्हेंबरला रद्द केला होता. त्याचदिवशी अमली पदार्थ तस्करीचा सूत्रधार ललित पाटील पलायन प्रकरणात तत्कालीन अधिष्ठाता डॉ. ठाकूर दोषी आढळले. राज्य सरकारने डॉ. ठाकूर यांना पदमुक्त केले तर अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ. प्रवीण देवकाते यांना निलंबित केले. त्यामुळे अधिष्ठातापद रिक्त झाल्याने डॉ. काळे यांनी तातडीने ११ नोव्हेंबरला या पदाचा कार्यभार स्वीकारला.



# खेड तालुक्यातील महसूल विभाग भ्रष्टाचाराचा बनला अड्डा

## तहसीलदाराविरुद्ध एकवटले ५०० वकील

पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।

खेड तालुक्यातील महसूल विभाग भ्रष्टाचाराचा अड्डा बनला आहे. येथे मोठ्या प्रमाणात एजंटगिरी सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. तालुक्यातील नागरिकांसह वकिलांना देखील त्याची आर्थिक झळ सोसावी लागत असल्याचा आरोप करून थेट प्रांताधिकारी जोगेंद्र कट्यारे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांची बदली करावी, अशी मागणी राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील ५०० वकिलांनी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याकडे केली आहे. बारचे अध्यक्ष ॲड. संजय गोपाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या वकिलांच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी उपजिल्हाधिकारी अजय मोरे, हिम्मत खराडे व धनंजय जाधव यांची संयुक्त चौकशी समिती नेमली आहे. सुनावणीदरम्यान प्रांताधिकारी आणि तहसीलदार गैरहजर रहात असून वरीष्ठ अधिकार्यांना देखील हे अधिकारी मुजोरी करीत असल्याचे वकील बारचे अध्यक्ष ॲड. संजय गोपाळे, माजी अध्यक्ष ॲड. अनिल राक्षे व इतरांनी म्हटले आहे. वकिलांच्या आरोप व तक्रारीत म्हटल्याप्रमाणे, खेड तहसीलदार, प्रांताधिकारी कार्यालयात कामानिमित्त येणारेया सर्वसामान्य नागरिक व वकिलांना दोन्ही अधिकार्यांकडून जाणीवपूर्वक हीन दर्जाची वागणुक दिली जाते. जेणेकरून अडलेले लोक एजंटकडे जातील. त्याद्वारे काम करून देताना आर्थिक लाभ होईल, असे रॅकेट तयार करण्यात आले आहे. वकिलांचे म्हणणे ऐकुन न घेता त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. वकील बाजुला ठेवुन नियमबाह्य कामकाज साध्य केले जाते. यामुळे तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय व आर्थिक पिळवणूक होत आहे. प्रांताधिकारी जोगेंद्र कट्यारे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे हे काही महिन्यांपूर्वी तालुक्यात रूजू झाले. मात्र त्यानंतर लगेचच कामकाजात आर्थिक देवाणघेवाणीचा अलिखित नियम लागू झाला. गौण खनिज उत्खनन, वाहतुक यासाठी ठरावीक रक्कम जमा करण्याचे काम एजंटामार्फत सुरू झाले. महसूलमधील कोणत्याही कामासाठी नागरिकांना एजंट शोधावा लागतो. नोंदी, फेरफार दुरुस्ती करताना लाखो रुपये लाटले जातात, असे आरोप वकील संघटनेच्या वतीने करण्यात आले आहेत. खेड तालुक्यातील करूळी, चिंबळी, मोई परिसरातील १२ गावातून पुणे रिंग रोड होणार आहे. जवळपास १५० कोटी रुपये नुकसान भरपाई वाटपाचे काम सुरू आहे. त्यासाठी संपादित केलेल्या जमिनीत बहुतांशी खातेदारांच्या अडचणी आहेत. प्रलंबित खातेफोड, वारस नोंदी, हक्क सोड यावरून न्यायनिवाडा न करता बाधितांना आर्थिक तडजोड करावी लागत आहे. हक्काची जमीन




### रिंग रोड पेमेंट वाटप रोखा

**» प्रांताधिकारी जोगेंद्र कट्यारे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे हे काही महिन्यांपूर्वी तालुक्यात रूजू झाले. मात्र त्यानंतर लगेचच कामकाजात आर्थिक देवाणघेवाणीचा अलिखित नियम लागू झाला. गौण खनिज उत्खनन, वाहतुक यासाठी ठरावीक रक्कम जमा करण्याचे काम एजंटामार्फत सुरू झाले. महसूलमधील कोणत्याही कामासाठी नागरिकांना एजंट शोधावा लागतो. नोंदी, फेरफार दुरुस्ती करताना लाखो रुपये लाटले जातात, असे आरोप वकील संघटनेच्या वतीने करण्यात आले आहेत.**